त्रेचाळीसावी सेवा प्रवेशोत्तर (लिपीक वर्गीय) परीक्षा मे २०११

संचालनालय, लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

परिपत्रक क्रमांक : परीक्षा १७- २०११ /४३ वी से.प्र. (लि .व.) परीक्षा- मे २०११/१०२/१५२८

दिनांक :- 5 MAR 2011 २०११

१) शासन निर्णय वित्त विभाग, क्र . डीएटी १७६८/७९/६९/१२, दि. ३१.१.१९६९

२) संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक - इएक्सएम - १७६९ / २१६७/ इ. दिनांक १६.४.१९६९

३) शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्रमांक डीएटी १७७१/४२२/७१/बारा, दि. ३.३.१९७१

## -:- परिपत्रक -:-

त्रेचाळीसावी सेवा प्रवेशोत्तर (लिपीकवर्गीय) परीक्षा माहे - मे २०११ मध्ये घेण्याचे घोषित करण्यांत येत आहे. परीक्षेच्या तारखा व कार्यक्रम नंतर जाहीर करण्यांत येईल. परीक्षा मुंबई /पुणे /नाशिक /नागपूर /औरंगाबाद व अमरावती या केंद्रामध्ये एकाच वेळी खालील नमुद केलेल्या अधिका-यांच्या अधिपत्याखालील त्या त्या केंद्रामध्ये घेण्यात येईल.

१. सह संचालक (कोषागारे)
संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई . — मुंबई विभाग व कोकण विभाग

सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे — पुणे विभाग

सहसंचालक, लेखा व कोषागारे,नाशिक — नाशिक विभाग

सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर — नागपूर विभाग

सहसंचालक, लेखा व कोषागारे,औरंगाबाद — औरंगाबाद विभाग

सहसंचालक, लेखा व कोषागारे,अमरावती — अमरावती विभाग

२. कार्यालय प्रमुखांनी येत्या सेवा प्रवेशोत्तर (लिपीक वर्गीय) परीक्षेस बसू इच्छिणा-या उमेदवारांचे विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या प्रमाणपत्रासह दिनांक ३१ मार्च २०११ किंवा त्यापूर्वी मिळतील अशा बेताने वरील अधिका-यांकडे विभागानुसार पाठवावेत.

३.	पूर्वीच्या परीक्षेमध्ये काही विषयात ज्या उमेदवारांना सूट मिळाली आहे त्या संबंधीची माहिती न चुकता (उमेदवारांना ) लिहिण्यास सांगावे. सूट असूनही पेपर क्रमांक, परीक्षेचे वर्ष, परीक्षा केंद्र, बैठक क्रमांक व मिळालेले गूण इत्यादी माहिती न लिहिल्यास अशा उमेदवारांना सर्व विषयाची परीक्षा द्यावी लागेल अर्जा मधील (सर्व ) माहिती बिनचुक देणे ही जबाबदारी उमेदवारांची आहे . ***दिनांक २ डिसेंबर २००८ नंतर शासकीय सेवेत रुजु झालेल्या कर्मचा-यांचे अर्ज पाठवू नयेत. नवीन परीक्ष नियम लागू झाल्यावर त्यांची परीक्षा घेण्यात येईल तसे त्यांना कळविण्यात येईल.***

४.	विशेष परवानगीसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी विहीत नमुन्यांत अर्ज करुन ते आपल्या विभागीय अधिकां-याकडे पाठवावेत मुंबई विभागाचे अर्ज मात्र संचालनालयास (परीक्षा शाखा) थेट पाठवावेत. अर्जाचा विहित नमुना या परिपत्रकासोबत जोडण्यांत येत आहे

५.	ही परीक्षा मराठी माध्यमातून घेण्यांत येईल. तथापि, ज्यांची मातृभाषा मराठी नाही व ज्यांनी त्यांना सक्तीची असणारी एतदर्थ मंडळाची मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण केलेली नाही व ज्यांचे मराठीचे ज्ञान फारच अपूरे आहे . अशाच कर्मचा-यांना इंग्रजी माध्यमातून उत्तरपत्रिका लिहिण्यास परवानगी देण्यांत येईल. इंग्रजीतून उत्तरपत्रिका लिहू इच्छिणा-या उमेदवाराने तसा अर्ज ३१ मार्च २०११ पर्यंत संचालनालयास प्राप्त होईल अशा पध्दतीने पाठवावा. उशीरा कळविल्यास तशी सोय करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

६.	सेंवा प्रवेशोत्तर (लिपिक वर्गीय) परीक्षेस बसू इच्छिणा-या कर्मचा-यांच्या सेवा नियमित असल्या पाहिजेत. ज्यांची सेवा नियमित नसेल त्यांना परवानगी नाकारण्यांत येईल. तरी अर्ज भरतांना अर्जातील अनुक्रमांक-५ कटाक्षाने अचूक भरण्यांत यावा. कार्यालय / विभाग प्रमुखांनी अर्जातील सर्व माहिती बरोबर असल्याची खात्री करावी. नंतर माहिती चुकीची असल्याचे आढळल्यास त्यांना जबाबदार ठरविले जाईल .

७.	संबधित सहसंचालक/ उपसंचालक, लेखा व कोषागारे यांनी ज्या कर्मचा-यांना विशेष संधी देणे आवश्यक आहे अशा कर्मचा-यांच्या अर्जाची विशेष काळजी पूर्वक तपासणी करावी अशा कर्मचा-यांना व इतर सर्व नियमित संधीच्या कर्मचा-यांना प्रथम प्रादेशिक स्तरावर (मुबई विभाग सोडून) प्राथमिक स्वरुपाची परीक्षेस बसण्यांस परवानगी द्यावी. ज्या कर्मचा-यांना विशेष संधी देणे आवश्यक आहे अशा कर्मचा-यांबाबत (१) कर्मचा-यांचे नांव (२) सेवेत आल्याची तारीख (३) चार वर्षे पूर्ण झालेली तारीख (४) सेवेत आल्यापासून घेतलेल्या एकूण संधी आणि (५) आता घेणार

असलेली संधी यांचे सविस्तर एकत्रित विवरण तयार करुन मूळ अर्जाची एक प्रत शिफारशीसह या संचालनालयास ६ एप्रिल २०११ पर्यन्त किंवा तत्पूर्वी प्राप्त होईल अशा पध्दतीने पाठवावी तसेच आपल्या विभागातील परवानगी दिलेल्या उमेंदवारांची यादी सुध्दा ६ एप्रिल २०११ पर्यन्त किवा तत्पूर्वी या संचालनालयास पाठवावी .

८. सन २०११ मध्ये होणा-या ४३ व्या सेवा प्रवेशोत्तर परीक्षेसाठी सर्व विभागीय कार्यालयातून बसणा-या उमेदवारांना परीक्षेचे बैठक क्रमांक पुढील क्रमांकापासून देण्यात यावे.

| अ.क्र. | विभागीय कार्यालयाचे नांव | बैठक क्रमांक |
|---|---|---|
| १. | सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती | AM 1 पासून पुढे |
| २. | सहसंचालक, लेखा व कोषागारे, औरंगाबाद | AU 1 पासून पुढे |
| ३. | संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई | MU 1 पासून पुढे |
| ४. | सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक | NS 1 पासून पुढे |
| ५. | सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर | NA 1 पासून पुढे |
| ६. | सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे | PU 1 पासून पुढे |

उमेदवार त्याच बैठक क्रमांकांनुसार परीक्षेस बसलेला आहे हे पाहण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विभागाच्या सहसंचालकांची / उपसंचालकांची असेल. यासाठी सहसंचालकांनी/ उपसंचालकांनी वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करुन विहित मुदतीत परिपूर्ण याद्या संचालनालयास सादर करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

९. गुणांच्या फेरतपासणीची आवश्यकता असल्यास <u>निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांचे आत</u> अर्ज करणे आवश्यक असेल. काही वेळा गुणपत्रक टपालाद्वारे उशीरा पोहोचतात त्यामुळे अनुत्तीर्ण उमेदवारांनी दूरध्वनीवरुन मिळालेल्या गुणांची माहिती घ्यावी व गुणफेरतपासणीसाठी विहित मुदतीत अर्ज करावा. याबाबत उमेदवारांना जाणीव करुन द्यावी.

(शिलानाथ जाधव)
संचालक, लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत सस्नेह अग्रेषित :-

१. - मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई (आपल्या अधिनस्त सर्व कार्यालयांना कृपया अवगत करावे)

प्रत अग्रेषित:

२. सहसंचालक / उपसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे /नाशिक / नागपूर/ अमरावती / औरंगाबाद / कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

४. सहमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, पुणे /नाशिक /नागपूर /अमरावती /औरंगाबाद / कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
(आपल्या विभागातील अधिनस्त सर्व कार्यालयांना कृपया अवगत करावे)

५. उपसंचालक, राज्य अभिलेख देखभाल अभिकरण यांचे कार्यालय, संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई

६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (आपल्या जिल्हयातील सर्व उपकोषागारात प्रसारित करणे)

७. सहासंचालक / लेखा अधिकारी (प्रशिक्षण) मुंबई /पुणे /नाशिक /नागपूर /अमरावती /औरंगाबाद

८. उपमुख्य लेखा परीक्षक (कनिष्ट) स्थानिक निधी लेखा सर्व जिल्हे.

९. निवड दप्तरी परीक्षा शाखा , संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई

१०. संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई ( नोटीस बोर्ड )

**माहे - मे २०११ मध्ये होणा-या सेवा प्रवेशोत्तर (लिपीक वर्गी य )परीक्षेस बसण्यासाठी परवानगी मिळण्याबाबत करावयाच्या अर्जाचा नमुना .**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | उमेदवारांचे नांव<br>( आडनांव प्रथम) | : | | | |
| २. | पदनाम | : | | | |
| ३. | कार्यालयाचे नांव / संपूर्ण पत्ता | : | | | |
| ४. | नियुक्तीची तारीख | : | | | |
| ५. | नियुक्ती नियमित आहे / नाही | : | | | |
| ६. | ज्या तारखेस परीक्षेला बसण्यासाठी अर्ज केला असेल त्या तारखेपर्य न्त अखंड सेवा . | : | वर्ष | महीने | दिवस |
| ७. | सेवा प्रवेशोत्तर (लिपीक वर्गीय) परीक्षा नियमानुसार पूर्वी किती वेळा परीक्षेला बसला,परीक्षेला बसलेली वर्षे . | : | | | |
| ८. अ | पूर्वी किती वेळा परवानगी दिली होती - वर्षे | : | | | |
| ८. ब | उमेदवारी मागे घेण्याची परवानगी कार्यालयाने दिली होती काय ? | : | | | |
| ८ .क | उमेदवारी मागे घेण्यास परवानगी दिली असल्यास आदेशाचा / पत्राचा क्रमांक व दिनांक | : | | | |
| ९. | पूर्वीच्या परीक्षेमध्ये काही विषयात सूट मिळाली असल्यास त्या संबधीची माहिती . | : | | | |
| ९.अ | परीक्षेचे वर्ष | : | | | |
| ९.ब | पेपर क्रमांक | : | | | |
| ९.क | परीक्षा केंद्र | : | | | |
| ९ .ड | बैठक क्रमांक | : | | | |
| ९.इ | मिळालेले गुण | : | | | |
| १०. | मातृभाषा | : | | | |
| ११. | परीक्षा केंद्र / दिनांक | : | | | |

उमेदवाराची स्वाक्षरी

कृ.मा.प.

१.	अर्जदाराने आपल्या अर्जामध्ये अनुक्रमांक ०१ ते ११ पर्यन्तच्या सदरातील दिलेली माहिती या कार्यालयाच्या अभिलेख्यांप्रमाणे तपासून पाहिली, दिलेली माहिती बरोबर आहे .

२.	सेवा नियमानुसार अर्जदाराला सेवा प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे .

३.	अर्जदाराची मातृभाषा मराठी नाही / त्यांचे मराठीचे ज्ञान फारच अपुरे असून सक्तीची असणारी तदर्थ मंडळाची मराठी भाषा परीक्षा ते उत्तीर्ण झालेले नाहीत म्हणून विशेष बाब म्हणून इंग्रजी माध्यमातून बसण्यांस विशेष परवानगी ची शिफारस करण्यांत येत आहे .

तारीख :-

ठिकाण :-

कार्यालय / विभाग प्रमुख स्वाक्षरी

************************************************************